महाराष्ट्र शासन

माहितीचा अधिकार

**ई-मेल द्वारा**

क्रमांक:माअअ-२०२०/प्र.क्र.१३/सेवा-६
वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २८.०२.२०२०
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९४०८३

प्रति,

Shri. Amit Dahiya,
R-151, Gali No. 14A,
Narela, Delhi,
Pin : 110040.

विषय: माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती पुरविण्याविषयी.

संदर्भ : आपला मा.अ.अ.अंतर्गत दि. ०३.०२.२०२० चा अर्ज.

महोदय,

आपला उपरोक्त विषयावरील मा.अ.अ.अंतर्गत अर्ज या कार्यासनात दिनांक ०३.०२.२०२० रोजी प्राप्त झाला आहे.

२. आपल्या सदरहू अर्जातील बहुतांश मुद्दे महिला व बाल कल्याण विभागाशी संबंधित आहेत. त्यामुळे आपणास हव्या असलेल्या माहितीच्या अनुषंगाने आपण, महिला व बाल कल्याण विभागाकडे परस्पर स्वतंत्र अर्ज करावा. तसेच आपणास या कार्यासनाशी संबंधित, प्रसूती रजा व बाल संगोपन रजा या विषयाबाबत, शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक १५.०१.२०१६, दिनांक २१.०९.२०१६, दिनांक २३.०७.२०१८, दिनांक १५.१२.२०१८ च्या प्रती या पत्रासमवेत नि:शुल्क उपलब्ध करुन देत आहे.

३. उपरोक्त उत्तरासंदर्भाने आपले समाधान झाले नसल्यास खालील प्राधिका-याकडे हे पत्र मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपिल करता येईल.

श्री. भा.ज.गाडेकर, राज्य अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दूरध्वनी क्रमांक-२२०२७८९८.

आपला,

सोबत : वरीलप्रमाणे.

( वि.अ.धोत्रे )
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव

Scanned with CamScanner

प्रसुती रजा संदर्भात सेवा कालावधीची अट वगळण्याबाबत

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : प्ररजा-२०१५/ प्र.क्र.२५/ सेवा-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १५ जानेवारी, २०१६.

वाचा : १) शासन निर्णय वित्त विभाग, क्र अरजा१४९०/१२/सेवा ९, दि. २८.०७.१९९५
२) शासन शुध्दीपत्र, वित्त विभाग, क्र अरजा१४९०/१२/सेवा ९, दि. २८.०७.१९९५
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अरजा-१४०१/प्र.क्र. ८/०९/सेवा-६, दि.२४.८.२००९

प्रस्तावना :

प्रसुती रजेसंदर्भातील तरतुदी महाराष्ट्र नागरी सेवा(रजा) नियम, १९८१ मधील नियम ७४ मध्ये करण्यात आल्या आहेत. सदर नियमातील नियम ७४ (२)(ए) नुसार कायम सेवेत नसलेल्या तथापि दोन वर्षे किंवा अधिक वर्षे सतत सेवा झालेल्या महिला शासकीय कर्मचाऱ्यांस नियम ७४(१ ) प्रमाणे प्रसुती रजा अनुज्ञेय आहे तसेच प्रसुती रजेच्या कालावधीत रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी तिला जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन अनुज्ञेय आहे.

सदर नियमातील नियम ७४ (२)(बी) नुसार कायम सेवेत नसलेल्या एक वर्षापेक्षा अधिक परंतु दोन वर्षापेक्षा कमी सतत सेवा झालेल्या महिला शासकीय कर्मचाऱ्यांस नियम ७४(१) प्रमाणे प्रसुती रजा अनुज्ञेय आहे. प्रसुती रजेच्या कालावधीत रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी तिला जेवढे वेतन मिळत असेल त्या रकमेच्या निम्मी रक्कम रजा वेतन म्हणून अनुज्ञेय आहे.

एक वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यास प्रसुती रजा कालावधीत प्रसुती रजा अनुज्ञेय होत नाही व कोणत्याही प्रकारचे रजा वेतन अनुज्ञेय नाही. परंतु प्रसुतीच्या कारणास्तव (वैद्यकीय कारणास्तव) तिच्या खाती असलेली अनुज्ञेय रजा/ असाधारण रजा घेता येते. त्यामुळे शासन सेवेत भरतीच्या मान्यताप्राप्त माध्यमाने रुजु झालेल्या महिला कर्मचाऱ्यांकरीता पूर्णवेतनी प्रसुती रजा अनुज्ञेय होण्यासाठी सेवा कालावधीची अट रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned with CamScanner

**<u>शासन निर्णय :</u>**

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४(२)(ए) व (बी) मधील किमान सेवेची अट रदद करण्यात येत असून राज्य शासनाच्या सेवेत भरतीच्या मान्यताप्राप्त माध्यमाने रुजु झालेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यास संदर्भाधीन दि.२४.०८.२००९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार असलेली प्रसुती रजा अनुज्ञेय राहिल व प्रसुती रजेच्या कालावधीत रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी तिला जेवढे वेतन मिळत असेल त्याप्रमाणे रजा वेतन अनुज्ञेय राहिल. अशी रजा, रजा खाती खर्ची टाकण्यात येणार नाही. तथापि, दोन वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यास सदर प्रसुती रजा व रजा वेतन खालील शर्तीच्या अधीन राहून अनुज्ञेय राहिल:-

१) प्रसुती रजा मंजूर करण्यापुर्वी ६ महिन्यांच्या वेतनाइतक्या रकमेचा बॉन्ड अशा शासकीय महिला कर्मचाऱ्याकडून घेण्यात यावा, तद्नंतरच उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे प्रसुती रजा व रजा वेतन अनुज्ञेय करण्यात यावे.

२) अशा शासकीय महिला कर्मचाऱ्याने प्रसूती रजा संपवून शासन सेवेत रुजू झाल्यानंतर किमान दोन वर्षे राज्य शासनाची सेवा करणे बंधनकारक राहील. सेवेचा दोन वर्षाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी, प्रसुती रजा कालावधीत /प्रसुती रजेनंतर रुजू न होता /प्रसुती रजा संपवून रुजु झाल्यावर, राज्य शासनाव्यतिरिक्त /राज्याच्या एकत्रित निधीतून वेतनावरील खर्च भागविला जात नाही अशा इतर सेवेत जाण्याकरीता प्रकरणपरत्वे कार्यमुक्त व्हावयाचे झाल्यास/ राजीनामा द्यावयाचा झाल्यास अथवा अन्य कारणास्तव राजीनामा द्यावयाचा झाल्यास अशा शासकीय महिला कर्मचाऱ्याने घेतलेल्या प्रसुती रजा कालावधीत देय झालेल्या वेतनाइतके वेतन राज्य शासनास अदा केल्यानंतरच अशा शासकीय महिला कर्मचाऱ्यास राज्य शासनाच्या सेवेचा राजीनामा देता येईल किंवा कार्यमुक्त होता येईल.

२. या सुविधेचा लाभ आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहिल.

३. या शासन निर्णयातील तरतुदीपुरते महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील यासबंधीच्या विद्यमान तरतुदी सुधारण्यात आल्या आहेत, असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमामध्ये रितसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल.



Scanned with CamScanner

४. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१६०११६११२८०९४६०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vidya Hemant Waghmare

Digitally signed by Vidya Hemant Waghmare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=f93efe7b946bf26ff989d6e5e01e1b122b9eb4e3e4e6799cb8e82b2d33d58dfc, cn=Vidya Hemant Waghmare
Date: 2016.01.16 11:34:53 +05'30'

**(विद्या वाघमारे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) राज्यपालांचे सचिव
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३) उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन , मुंबई
५) सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
६) मंत्रालयीन सर्व विभाग
७) मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
८) * प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
९) * प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
१०)* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
११)* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१२)* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१३)* आयुक्त, राज्य माहिती आयोग, (सर्व)
१४)* सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१५)* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद
१६) महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
१७) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
१८) महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
१९) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
२०) सिनियर रिसर्च ऑफीसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
२१) सर्व विभागीय आयुक्त
२२) सर्व जिल्हाधिकारी
२३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
२४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.



Scanned with CamScanner

२५)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२६)निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२७)जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब,
२८)सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२९)सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक,
३०)मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.
३१)मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
३२)कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी/देहूरोड/देवळाली/अहमदनगर
३३)बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
३४)भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.,बॅरेक क्रमांक-१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईट, मुंबई-२०
३५)भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही. पटेल रोड, मुंबई-४
३६)भारतीय कम्युनिस्ट पार्टी,(मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३
३७)इंडियन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉग्रेस (आय)समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
३८)नॅशनलिस्ट कॉग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईट, मुंबई-२१
३९)शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८
४०)वित्त विभागातील सर्व कार्यासन
४१)निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-९)

* पत्राने



Scanned with CamScanner

**विकलांग अपत्य असलेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष बाल संगोपन रजा मंजूर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र. ५७/सेवा-६**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २१/०९/२०१६.

**प्रस्तावना :**

श्रीमती दिपिका सागर नेर्सेकर, लघुलेखिका (उच्च श्रेणी), लघुवाद न्यायालय, मुंबई यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने विकलांग अपत्य असलेल्या महिला शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष बाल संगोपन रजा देण्याबाबत विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम,१९९५ मधील कलम-१३, उपकलम(१) अन्वये स्थापित केलेल्या राज्य समन्वय समितीने शासनास सल्ला द्यावा व सदर सल्ल्यानुसार शासनाने निर्णय घ्यावा असे निदेश दिले होते. त्याप्रमाणे उपरोक्त नियमानुसार स्थापित केलेल्या राज्य समन्वय समितीने शासनास या विषयी शिफारशी केल्या आहेत. त्याअनुषंगाने विकलांग अपत्य असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष बाल संगोपन रजा मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती :-

**शासन निर्णय :**

विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम,१९९५ मधील कलम-१३, उपकलम (१) अन्वये स्थापित केलेल्या राज्य समन्वय समितीची शिफारस विचारात घेऊन, पुढे नमुद केल्यानुसार अपत्य असलेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यास तसेच पुढे नमुद केल्यानुसार अपत्य असून पत्नी नसलेल्या शासकीय पुरुष कर्मचाऱ्यास म्हणजेच अशा अपत्याच्या वडीलांनादेखील संपूर्ण सेवेत ७३० दिवसांच्या कमाल मर्यादेत विशेष बाल संगोपन रजा मंजूर करण्यास शासन मान्यता देत आहे:-

(अ) विकलांग व्यक्तींसाठी (समानसंधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम २(झ) नुसार पुढील विकलांगता

(१)अंधत्व (Blindness), (२) क्षीण दृष्टी (Low vision), (३) बरा झालेला कुष्ठरोग (Leprosy-cured) (४)श्रवण शक्तीतील दोष (Hearing impairment) (५) चलन-वलन विषयक

Scanned with CamScanner

विकलांगता (Loco Motor disability) (६) मतिमंदता ((Mental retardation) (७) मानसिक आजारपण(Mental illness)

सदर विकलांगता उपरोक्त अधिनियमातील विकलांगतेबाबतच्या व्याख्येप्रमाणे असणे अनिवार्य राहील तसेच सदर विकलांगता किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त आहे, असे वैद्यकीय प्राधिकरणाने प्रमाणित केले पाहिजे.

(आ) दि नॅशनल ट्रस्ट फॉर दि वेलफेअर ऑफ पर्सन्स विथ ऑटीझम, सेरेब्रल पाल्सी, मेंटल रिटार्डेशन आणि मल्टीपल डिसॅबिलीटी ॲक्ट १९९९ मधील कलम २(ए), २(सी), २(जी), २(एच) व २(ओ) मध्ये वर्णन केल्यानुसार अनुक्रमे आत्ममग्न(Autism), सेरेब्रल पाल्सी(cerebral palsy), मतिमंद(mental retardation), बहुविकलांग(multiple disabilities) व गंभीर स्वरुपाची विकलांगता( severe disability) असलेले अपत्य

२. सदर रजा अनुज्ञेयतेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

i) उपरोक्त परिच्छेद क्र.१ मधील विकलांगतेबाबत जिल्हा शल्य चिकित्सक (Civil Surgeon) अथवा त्यापेक्षा वरिष्ठ शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याने अथवा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्णयानुसार निर्गमित केलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

ii) सदर रजा हक्क म्हणून मागता येणार नाही. सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेनेच सदर रजा घेता येईल.

iii) सदर रजा विकलांग अपत्याच्या वयाच्या २२ वर्षापर्यंत घेता येईल.

iv) सदर रजा पहिल्या २ हयात अपत्याकरीता लागू राहील.

v) विशेष बाल संगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन देण्यात येईल.

vi) सदर रजा एकाहून अधिक हप्त्यामध्ये (Spell) तथापि एका आर्थिक वर्षात तीनापेक्षा जास्त नाही अशा मर्यादेत घेता येईल.

vii) विशेष बालसंगोपन रजेचा हिशोब सोबत जोडलेल्या प्रपत्रात घेऊन ते सेवापुस्तकात ठेवावे. तसेच सेवा पुस्तकामध्येही हिशोब योग्यरित्या नोंदविण्यात यावा.



Scanned with CamScanner

viii) परिविक्षाधीन कालावधीत विशेष बाल संगोपन रजा मान्य करता येणार नाही तथापि, कर्मचाऱ्यास विकलांग अपत्याबाबतच्या गंभीर परिस्थितीमुळे रजा घेणे अत्यावश्यक आहे अशी रजा मंजूर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यास, परिविक्षाधीन कालावधीत अपवादात्मक परिस्थितीत कमीत कमी कालावधीची विशेष बालसंगोपन रजा घेता येईल. त्या प्रमाणात संबंधित महिला/पुरुष शासकीय कर्मचाऱ्याचा परिविक्षाधीन कालावधी वाढविला जाईल.

ix) विशेष बाल संगोपन रजेस पात्र असणारा महिला/पुरुष शासकीय कर्मचारी एकापेक्षा जास्त वेळा नवीन नियुक्ती स्वीकारत असेल अशा बाबतीत वेगवेगळ्या ठिकाणच्या कालावधीची रजा एकत्रित गणली जाऊन, अशा एकूण सेवेच्या कालावधीमध्ये एकूण ७३० दिवस इतकीच रजा अनुज्ञेय होईल.

x) अर्ज केल्यास विशेष बाल संगोपन रजेला जोडून अन्य अनुज्ञेय रजा जोडून घेता येईल मात्र अन्य अनुज्ञेय रजा कालावधी एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही

xi) विकलांग अपत्य शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबून आहे, असे प्रमाणपत्र शासकीय कर्मचाऱ्याने सादर करणे अनिवार्य राहील.

३. हे आदेश मान्यता प्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि कृषि व बिगर कृषि विद्यापीठे व त्यांना संलग्न असलेली महाविद्यालये यामधील पूर्णकालिक शिक्षक व शिक्षकेतर महिला कर्मचारी यांनादेखील लागू राहतील.

४. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

५. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्ये आवश्यक सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

६. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.



Scanned with CamScanner

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०९२०१६५३४४६००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vidya Hemant Waghmare

Digitally signed by Vidya Hemant Waghmare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=f93efe7b946bf26ff989d6e5e01e1b122b9eb4e3e4e6799cb8e82b2d33d58dfc, cn=Vidya Hemant Waghmare
Date: 2016.09.21 13:08:09 +05'30'

(विद्या वाघमारे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
६) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
७) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
८) महालेखापाल-१ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई
९) महालेखापाल-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, नागपूर
१०) महालेखापाल (वाणिज्य लेखा परिक्षा), मुंबई
११) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
१२) कुलगुरु, कृषि विद्यापीठे/बिगर कृषि विद्यापीठ
१३) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक
१४) प्रबंधक, मुळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१५) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१६) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१८) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई
१९) मुख्य माहिती आयुक्त, मुंबई
२०) आयुक्त, राज्य माहिती आयोग ( सर्व )
२१) सचिव, राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०००३२
२२) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
२३) विशेष आयुक्त, नवीन महाराष्ट्र सदन, कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली ११० ००१
२४) मंत्रालयाच्या निरनिराळया विभागाच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
२५) सर्व विभागीय आयुक्त
२६) सर्व जिल्हाधिकारी
२७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
२९) सर्व जिल्हयाचे वरिष्ठ लेखापरिक्षक (शिक्षण)
३०) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई



Scanned with CamScanner

३१) आयुक्त, शिक्षण, शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
३२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, दंत विद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई -४००००१
३३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई- ४००००१
३४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
३६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३७) विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
३८) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी. ओ. बॅरेक नं.-१, योगक्षेम समोर, व.भा. चौक, नरीमन पॉईट, मुंबई -४०००२०
३९) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही. पटेल रोड, मुंबई -४००००४
४०) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, ( मार्क्सवादी ), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल , ग्लोबल मिल पॅलेस, वरळी, मुंबई -४०००१३
४१) इंडियन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई- ४०००२५
४२) नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईट, मुंबई ४०००२१
४३) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई -४०००२८
४४) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान,मुंबई -४००००१
४५) निवडनस्ती ( कार्यासन सेवा-६)



Scanned with CamScanner

## विशेष बाल संगोपन रजेच्या हिशोबाबतचे प्रपत्र

| बाल संगोपन रजेचा कालावधी | | एकूण कालावधी | शिल्लक रजा | | सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम, कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| दिनांकापासून | पर्यंत | | दिनांक | शिल्लक | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |



Scanned with CamScanner

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना बाल संगोपन
रजा मंजूर करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२५/सेवा-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २३/०७/२०१८

**प्रस्तावना** : :

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या मुलाच्या संगोपनासाठी बाल संगोपन रजा मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या काही काळ विचाराधीन होता. त्याबाबत सांगोपांग विचार करुन पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

राज्य शासकीय महिला कर्मचारी तसेच पत्नी नसलेले पुरुष वर्गीय शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषदेचे शिक्षक व शिक्षकेतर महिला कर्मचारी, जिल्हा परिषदेचे पत्नी नसलेले पुरुष वर्गीय शासकीय कर्मचारी, मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कृषि व बिगर कृषि विद्यापीठे व त्यांना संलग्न असलेली महाविद्यालये यामधील पूर्णकालिक शिक्षक व शिक्षकेतर महिला कर्मचारी व पत्नी नसलेल्या पुरुष कर्मचाऱ्यास तसेच वर नमूद केलेल्या विविध कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यांची पत्नी असाध्य आजाराने अंथरुणाला खिळलेली आहे, अशा कर्मचाऱ्यास देखील **१८० दिवसांच्या कमाल मर्यादेत बाल संगोपन रजा** पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यास या शासन निर्णयाद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

i) मुलांचे वय १८ वर्षे होईपर्यंतच सदर रजा लागू राहील. (बाल संगोपन रजेवर असताना मुलाच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यास, त्या दिनांकापासून पुढे सदर रजा लागू होणार नाही, याची खात्री करण्याची जबाबदारी, रजा मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याची राहील.)

ii) एका वर्षामध्ये २ महिन्यांच्या कमाल मर्यादेत सदर रजा घेता येईल.

iii) सदर रजा ही उपरोक्त अट क्र.१ च्या अधिन राहून सेवा कालावधीत १/२/३/४ टप्प्यात (In Spells) घेता येईल. तथापि, सदर रजा एका कॅलेंडर वर्षात तीन टप्प्यांमध्ये ( In Three Spells) घेता येईल.

iv) पहिल्या २ ज्येष्ठतम हयात मुलांकरिता लागू राहील.

v) शासकीय सेवेचे १ वर्ष पूर्ण झाल्यावर सदर रजा लागू राहील.

vi) अर्जित रजा व अर्धवेतनी रजा खात्यावर असली तरी सदर रजा मंजूर करता येईल.

vii) अर्जित रजा, अर्धवेतनी रजा तसेच प्रसूती रजेला जोडून ही रजा घेता येईल.

Scanned with CamScanner

viii) एका कॅलेंडर वर्षात घेतलेली रजा पुढील कॅलेंडर वर्षीही सलग असल्यास, ती ज्या कॅलेंडर वर्षात प्रारंभ झाला, त्या कॅलेंडर वर्षातील समजण्यात येईल.

ix) बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन देण्यात येईल.

x) परिवीक्षाधीन कालावधीत बालसंगोपन रजा मान्य करता येणार नाही. तथापि, रजा मंजूर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यास, कर्मचाऱ्याच्या मुलाबाबतच्या गंभीर परिस्थितीमुळे त्यास रजा घेणे अत्यावश्यक आहे अशी खात्री झाल्यास, परिवीक्षाधीन कालावधीतही संबंधितास अपवादात्मक परिस्थितीत, कमीत कमी कालावधीची विशेष बालसंगोपन रजा मंजूर करता येईल. त्या प्रमाणात संबंधित महिला/पुरुष कर्मचाऱ्याचा परिवीक्षाधीन कालावधी वाढविला जाईल.

xi) सदर रजा कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) अनुज्ञेय ठरणार नाही.

xii) सदर रजा हक्क म्हणून मागता येणार नाही. सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेनेच सदर रजा घेता येईल. बालसंगोपन रजा मंजूर करताना पदनिर्मिती तसेच पदभरती होणार नाही व दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन रजा मंजूर करण्याची जबाबदारी सक्षम अधिकाऱ्याची राहील. संबंधित कर्मचाऱ्याची वारंवार रजा घेण्याची प्रवृत्ती नाही, ही बाब देखील सदर रजा मंजूर करताना विचारात घ्यावी.

xiii) कर्मचारी एकापेक्षा जास्त वेळा नवीन नियुक्ती स्वीकारत असेल अशा बाबतीत, वेगवेगळया ठिकाणचा कालावधी एकत्रित गणला जाऊन अशा एकूण सेवेच्या कालावधीमध्ये वेगवेगळया ठिकाणी नियुक्ती असली तरी एकंदर १८० दिवस इतकीच बालसंगोपन रजा अनुज्ञेय होईल.

xiv) बालसंगोपन रजेचा हिशोब सोबत जोडलेल्या प्रपत्रात घेऊन ते सेवापुस्तकात ठेवावे. तसेच सेवा पुस्तकामध्ये देखील उपभोगलेल्या बाल संगोपन रजेची नोंद घ्यावी.

xv) ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्याची सेवा किमान दहा वर्षे होण्याच्या आधी सदर कर्मचाऱ्यास राज्य शासनाच्या सेवेतून, राज्य शासनाव्यतिरिक्त अथवा राज्याच्या एकत्रित निधीतून वेतनावरील खर्च भागविला जात नाही, अशा इतर सेवेत जाण्याकरिता किंवा अन्य कारणास्तव राजीनामा द्यावयाचा असल्यास अथवा कार्यमुक्त व्हावयाचे झाल्यास, अशा कर्मचाऱ्याने बाल संगोपन रजा म्हणून घेतलेल्या कालावधीतील वेतनाइतके वेतन,राज्य शासनास अदा केल्यानंतरच अशा कर्मचाऱ्यास राज्य शासनाच्या सेवेचा राजीनामा देता येईल किंवा राज्य शासकीय सेवेतून कार्यमुक्त होता येईल. संबंधित शासकीय कर्मचाऱ्याने तशा आशयाचे बंधपत्र (बाँड) सदर रजेसाठी अर्ज करताना कार्यालयास, न चुकता सादर करावे.



Scanned with CamScanner

xvi) पत्नी असाध्य आजाराने अथंरुणास खिळलेली आहे अशा पुरुष कर्मचाऱ्यास त्याच्या मुलाच्या बालसंगोपनाच्या प्रयोजनासाठी बाल संगोपन रजा अनुज्ञेय करण्यासाठी, पत्नीच्या आजाराबद्दल, तसेच आजाराबद्दलच्या निकषाबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित केले जातील. त्यानंतरच अशा कर्मचाऱ्यास बाल संगोपन रजा विहीत अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करता येईल.

२. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

३. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्ये आवश्यक त्या सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०७२३१७२८३४९८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=93c75178c3c4e1daaeb069f4e437a48fd302aabd78545 0129e4447d5a1da1f2a, serialNumber=d2671e08dbf49e6a42b865d026c3f07bc1eb4254 056eab8fa6b4b0fb72dd47ba, cn=Bhalchandra Jagannath Gadekar
Date: 2018.07.23 17:32:21 +05'30'

**सोबत :** विहित प्रपत्र.

**(भा.ज.गाडेकर)**
**उप सचिव, वित्त विभाग**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३. मा.विरोधी पक्ष नेते, विधान सभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव व सचिव,मंत्रालय,मुंबई.
७. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई .
८. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर .
९. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
१०.महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
११.महालेखापाल (वाणिज्य लेखा परीक्षा), मुंबई.
१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.



Scanned with CamScanner

१४.आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय ,पुणे.
१५.संचालक, शालेय शिक्षण (प्राथमिक) विभाग ,पुणे.
१६.संचालक, शालेय शिक्षण (माध्यमिक ) विभाग ,पुणे.
१७.संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे.
१८. संचालक, तंत्र शिक्षण विभाग,मुंबई.
१९.संचालक, व्यवसाय शिक्षण ,मुंबई.
२०.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन , मुंबई.
२१.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई.
२२.कुलगुरु/ कुलसचिव, कृषि विद्यापीठे/बिगर कृषि विद्यापीठे.
२३.सर्व जिल्हा शल्य चिकित्सक.
२४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२५.प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
२६.प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
२७.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२९.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
३०.मुख्य माहिती आयुक्त , मुंबई.
३१.आयुक्त, राज्य माहिती आयोग ( सर्व ).
३२.सचिव, राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०००३२.
३३.ग्रंथपाल,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
३४.विशेष आयुक्त,नवीन महाराष्ट्र सदन,कस्तुरबा गांधी मार्ग, के.जी.मार्ग, नवी दिल्ली ११० ००१.
३५.मंत्रालयाच्या निरनिराळया विभागांच्या अधिन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
३६.सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी.
३७.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
३९.सर्व जिल्हयाचे वरिष्ठ लेखा परिक्षक (शिक्षण).
४०.संचालक , महानगरपालिका प्रशासन, मुंबई.
४१.बृहन्मुंबई महानगरपालिका,भविष्य निर्वाह निधी विभाग, प्रमुख लेखापाल यांचे कार्यालय, मुंबई.
४२.सर्व आयुक्त महानगरपालिका /सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद.
४३.सर्व मंत्रालयीन विभाग.
४४.इंडियन नॅशनल कॉग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब



Scanned with CamScanner

४५.गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई.

४६.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी. ओ. बॅरेक नं.-१, योगक्षेम समोर, नरीमन पॉईट, मुंबई ४०० ०२०.

४७.नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईट.

४८. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०० ०२८.

४९.बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान,मुंबई ४०० ००१.

५०.भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही. पटेल रोड, मुंबई ४०० ००४.

५१.भारतीय कम्युनिस्ट पार्टी , ( मार्क्सवादी ) , महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल , ग्लोबल मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०० ०१३.

५२.वित्त विभागातील सर्व कार्यासने.

५३.निवडनस्ती ( सेवा-६).



Scanned with CamScanner

## विशेष बाल संगोपन रजेच्या हिशोबाबाबतचे प्रपत्र

विभाग /कार्यालयाचे नाव :

अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम :

भ्रमणध्वनी/दूरध्वनी क्रमांक :

| बाल संगोपन रजेचा कालावधी | | शिल्लक रजा | | सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम, कार्यालय |
|---|---|---|---|---|
| पासून | पर्यंत | शिल्लक | दिनांक | |
| १ | २ | ३ | ४ | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |



Scanned with CamScanner

राज्य शासकीय व अन्य कर्मचाऱ्यांना बाल संगोपन
रजा मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२५/सेवा-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ डिसेंबर २०१८

वाचा : शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२५/सेवा-६,
दिनांक २३.०७.२०१८.

**प्रस्तावना ::**

राज्य शासकीय व अन्य कर्मचाऱ्यांना त्यांच्या मुलाच्या संगोपनासाठी बाल संगोपन रजा मंजूर करण्याबाबतचा शासन निर्णय वरीलप्रमाणे दिनांक २३.०७.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१(XVI) मध्ये नमूद केल्यानुसार, ज्या पुरुष वर्गीय शासकीय कर्मचाऱ्याची पत्नी असाध्य आजाराने अंथरुणास खिळलेली आहे, अशा पुरुष कर्मचाऱ्यास त्याच्या मुलाच्या बालसंगोपनाच्या प्रयोजनासाठी बाल संगोपन रजा अनुज्ञेय करण्यासाठी, पत्नीस कोणकोणते आजार असले पाहिजेत, तसेच अशा स्वरुपाचे आजार असल्याबाबत कोणकोणते निकष असावेत, याबाबतचा प्रस्ताव काही काळ, शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रकरणी सर्वसाकल्याने विचार करुन, पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

## शासन निर्णय :

ज्या राज्य शासकीय पुरुष कर्मचारी, जिल्हा परिषदेचे शिक्षक व शिक्षकेतर पुरुष कर्मचारी, मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कृषि व बिगर कृषि विद्यापीठे व त्यांना संलग्न महाविद्यालयातील पूर्णकालिक शिक्षक व शिक्षकेतर पुरुष कर्मचारी यांची पत्नी विविध आजारपणाच्या कारणास्तव जेवढ्या कालावधीसाठी अंथरुणास खिळून राहिली आहे (Bed Ridden), अथवा त्यांची पत्नी मनोरुग्ण असल्यामुळे, जेवढ्या कालावधीसाठी बाल संगोपन करण्यास असमर्थ होत आहे(Incapacitated), तेवढ्या कालावधीचे वैद्यकीय अधीक्षक (जे.जे.रुग्णालय)/जिल्हा शल्य चिकित्सक (शहरी भागासाठी)/ जिल्हा आरोग्य अधिकारी (ग्रामीण भागासाठी) यांचेकडून संबंधित शासकीय कर्मचाऱ्याने वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, संबंधित शासकीय पुरुष कर्मचाऱ्यास, तेवढ्या कालावधीची बाल संगोपन रजा अनुज्ञेय करण्यास, या शासन निर्णयान्वये मान्यता घेण्यात येते.

Scanned with CamScanner

२. शासकीय कर्मचाऱ्याची पत्नी किती कालावधीसाठी आंतररुग्ण आहे (In-patient) आणि अंथरुणास खिळलेली आहे अथवा बालसंगोपन करण्यास असमर्थ आहे, हे पाहून प्रकरणपरत्त्वे तेवढ्या कालावधीची (१८० दिवसाच्या कमाल मर्यादेत), बाल संगोपन रजा संबंधित पुरुष शासकीय कर्मचाऱ्यास अनुज्ञेय राहणार आहे. तसेच बाल संगोपनासाठी पतीला रजा मंजूर झाल्यानंतर, रजा कालावधीत पत्नीचा मृत्यु झाल्यास, पतीला उर्वरित कालावधीची बाल संगोपन रजा १८० दिवसांच्या कमाल मर्यादेत अनुज्ञेय राहील.

३. बाल संगोपन रजेबाबत शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २३.०७.२०१८ मधील अटी व शर्ती या शासन निर्णयान्वये बाल संगोपन रजा घेणाऱ्या लाभार्थ्यांना लागू राहतील.

४. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

५. या शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्ये आवश्यक त्या सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्र. २०१८१२१५१५०१४१७२०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Shrikant Devidasrao Londhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=79c7a1a5cbac6bb040957336242ead2e484e7eee68c06c510363ef7c9edf4ac2, serialNumber=b973cbc71c4136d97edeae58395e03da221147d1afdd343ba4d7a2492e6a54b6, cn=Shrikant Devidasrao Londhe
Date: 2018.12.15 15:05:56 +05'30'

**सोबत** : विहित प्रपत्र

**(श्री. दे. लोंढे)**
**अवर सचिव, वित्त विभाग**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३. मा.विरोधी पक्ष नेते, विधान सभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव व सचिव,मंत्रालय,मुंबई.
७. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई .
८. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर .
९. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
१०.महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.



Scanned with CamScanner

११.महालेखापाल (वाणिज्य लेखा परीक्षा), मुंबई.
१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४.आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय ,पुणे.
१५.संचालक, शालेय शिक्षण (प्राथमिक) विभाग ,पुणे.
१६.संचालक, शालेय शिक्षण (माध्यमिक) विभाग ,पुणे.
१७.संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे.
१८. संचालक, तंत्र शिक्षण विभाग,मुंबई.
१९.संचालक, व्यवसाय शिक्षण ,मुंबई.
२०.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन , मुंबई.
२१.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई.
२२.कुलगुरु/ कुलसचिव, कृषि विद्यापीठे/बिगर कृषि विद्यापीठे.
२३.सर्व जिल्हा शल्य चिकित्सक.
२४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२५.प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
२६.प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
२७.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२९.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
३०.मुख्य माहिती आयुक्त , मुंबई.
३१.आयुक्त, राज्य माहिती आयोग ( सर्व ).
३२.सचिव, राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०००३२.
३३.ग्रंथपाल,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
३४.विशेष आयुक्त,नवीन महाराष्ट्र सदन,कस्तुरबा गांधी मार्ग, के.जी.मार्ग,
नवी दिल्ली ११० ००१.
३५.मंत्रालयाच्या निरनिराळया विभागांच्या अधिन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
३६.सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी.
३७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
३९.सर्व जिल्हयाचे वरिष्ठ लेखा परिक्षक (शिक्षण).
४०.संचालक , महानगरपालिका प्रशासन, मुंबई.



Scanned with CamScanner

४१.बृहन्मुंबई महानगरपालिका,भविष्य निर्वाह निधी विभाग, प्रमुख लेखापाल यांचे कार्यालय, मुंबई.

४२.सर्व आयुक्त महानगरपालिका /सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद.

४३.सर्व मंत्रालयीन विभाग.

४४.इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब

४५.गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई.

४६.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी. ओ. बॅरेक नं.-१, योगक्षेम समोर, नरीमन पॉईट, मुंबई ४०० ०२०.

४७.नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईट.

४८. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०० ०२८.

४९.बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान,मुंबई ४०० ००१.

५०.भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही. पटेल रोड, मुंबई ४०० ००४.

५१.भारतीय कम्युनिस्ट पार्टी , (मार्क्सवादी) , महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल , ग्लोबल मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०० ०१३.

५२.वित्त विभागातील सर्व कार्यासने.

५३.निवडनस्ती ( सेवा-६).



Scanned with CamScanner

## विशेष बाल संगोपन रजेच्या हिशोबाबाबतचे प्रपत्र

| बाल संगोपन रजेचा कालावधी | | शिल्लक रजा | | सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम, कार्यालय |
|---|---|---|---|---|
| पासून | पर्यंत | शिल्लक | दिनांक | |
| १ | २ | ३ | ४ | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |



Scanned with CamScanner